मा.अति.महा.आयुक्त(ज)
पुणे महानगरपालिका
ठराव क्रं:१/८९
दिनांक :- १४/०६/२०२४

अति.महापालिका आयुक्त (ज)
पुणे महानगरपालिका
जा.क्रं:-अतिमआ(ज)/साप्रवि/: २५८३
दिनांक:- १४/०६/२०२४

## -:आज्ञापत्र:-

विषय:- पुणे महानगरपालिकेच्या माध्यमिक व तांत्रिक शिक्षण विभागाचे शाळांकडील मराठी माध्यम 'शालाप्रमुख' वर्ग-२ या संवर्गातील तात्पुरत्या स्वरुपात बढतीने नेमणूकीबाबत

संदर्भ :- १) मा.महापालिका आयुक्त ठ.क्रं.१/३७३ दि.१४/०३/२०२४
२) मा.अति.महापालिका आयुक्त (ज) ठ.क्रं.१/८० दि.१४/०६/२०२४

पुणे महानगरपालिका संचालित माध्यमिक व तांत्रिक शिक्षण विभागाचे शाळाकडील 'माध्यमिक शिक्षक' वर्ग-३ वेतन संरचना (एस-१४: ३८६००-१२२८००) या निम्न संवर्गातून 'शालाप्रमुख' वर्ग-२ वेतन संरचना (एस-१७: ४७६००-१५११००) या पदावर तात्पुरत्या स्वरुपात बढतीने नेमणूका करणेसाठी संदर्भ क्रं १ चे ठरावान्वये मान्य झालेल्या निवडयादी वरील खालील शिक्षकांच्या संदर्भ क्रं.२ चे मान्यतेनुसार त्यांचे नावांसमोर दर्शविलेल्या तपशिल्याप्रमाणे या आज्ञापत्रकाचे दिनांकापासून तात्पुरत्या स्वरुपात बढतीने नेमणुका करण्यात येत आहे.

मराठी माध्यम 'शालाप्रमुख'वर्ग-२"

| अ. क्र | सेवकाचे नाव | पदोन्नतीचा संवर्ग | सध्याची शाळा | पदोन्नतीची शाळा | शेरा |
|---|---|---|---|---|---|
| १ | श्री. लोंढे संजय नबाजी | सेवाज्येष्ठतेने | श्रीमती अनुसयाबाई खिलारे माध्यमिक विद्यालय एरंडवणे | यशवंतराव चव्हाण मा.वि. बिबवेवाडी | संच मान्यतेनुसार रिक्त जागी |

१) उपरोक्त पदोन्नती ही महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्रमांक : बीमीसी २०१८/प्र.क्र.३६६/१६-ब, दिनांक ०७ मे, २०२१चे अधिन राहून करण्यात येत आहे.

२) उपरोक्त सेवकांची पदोन्नती मा.सर्वोच्च न्यायालयात विशेष अनुज्ञा याचिका क्रं २८०६/२०१७ च्या अधिन असून पदोन्नतीच्या कोट्यातील रिक्त पदावर निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात देण्यात येत आहे. तसेच खालील अटीच्या अधिन राहून सदर पदोन्नती देण्यात येत आहे.

(अ) सदर अधिकाऱ्यांविरूध्द आदेशाच्या दिनांकापर्यंत कोणत्याही प्रकारची विभागीय चौकशी सुरू झालेली नाही.

(ब) या तात्पुरत्या पदोन्नतीमुळे संबंधित अधिकाऱ्यांना नियमित पदोन्नतीचे म्हणजेच ज्येष्ठतेचे कोणतेही हक्क प्राप्त होणार नाहीत.

(क) मागास प्रवर्गातील अधिकाऱ्यांची पदोन्नती सदर अधिकाऱ्यांचे जात वैधता प्रमाणपत्र संबंधित जात पडताळणी समितीने निर्गमित केले आहे या अटीच्या अधिन राहून करण्यात येत आहे.

वरील प्रमाणे तदर्थ बढतीने केलेल्या नेमणूका या मनपा सेवाविनियम १० (अ) नुसार परिविक्षाधिन आहे. परिविक्षाधिन कालावधीमध्ये संबंधित सेवकांचे काम, कामावरील उपस्थिती व वर्तणूक असमाधानकारक असल्याचे आढळून आल्यास त्यांना कोणतीही पूर्व सूचना न देता बढतीपुर्व पदावर तात्काळ पदावनत करण्यात येईल.

शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, शासन निर्णय क्र. एसएसएन/२६९८/११७९२/(१४०/९८) माशी-२, मंत्रालय विस्तार भवन, मुंबई ४०००३२, दिनांक १३ जून, २००५ नुसार शैक्षणिक वर्ष २००४-२००५ पासून नियुक्त होणाऱ्या उप मुख्याध्यापक व मुख्याध्यापकांना यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाने तयार केलेला व त्यांच्या मार्फतच पत्रद्वारा राबविण्यात येणारा १ वर्षाचा शालेय व्यवस्थापन पदविका अभ्यासक्रम पुढील ५ वर्षात अथवा सेवानिवृत्तीपूर्वी जो कालावधी कमी असेल त्या कालावधीत पूर्ण करणे बंधनकारक तसेच आवश्यक आहे. **सदर अभ्यासक्रम पुर्ण केल्या बाबतची नोंद संबंधित सेवकांच्या सेवापुस्तकात घेण्यात यावी.**

३) वरील नियुक्त्या मे.राज्य शासनाच्यावतीने मा.सर्वोच्च न्यायालयात दाखल करण्यात आलेल्या विशेष अनुमती याचिका डायरी क्र.३३१५१/२०१७ मध्ये मा.सर्वोच्च न्यायालयाचा पदोन्नती मधील आरक्षणाबाबत जो काही निर्णय होईल,त्यानुसार मागसाप्रवर्गातील अधिकारी यांच्या पदोन्नतीमधील आरक्षणाबाबत योग्य तो निर्णय घेण्यात येईल,या निर्णयाच्या अधीन राहून करण्यात येत आहे.

४) वरील सेवकांनी आज्ञापत्राच्या दिनांकापासून १५ दिवसाचे आत पदोन्नतीचे शाळेत रुजू व्हावे. सदर मुदतीत रुजू न झाल्यास सदरची पदोन्नती आपोआप रद्द होईल. तसेच उपरोक्त सेवकांना मनपा सेवाविनियम व वेळोवेळी शासन पारित करतील ते शासन निर्णय लागू होतील.

५) संबंधित सेवकास मनपा सेवाविनियमानुसार वेतन व अन्य भत्ते आदा करणेत यावेत.

६) या आज्ञापत्रकाची नोंद उपरोक्त सेवकांच्या सेवापुस्तकामध्ये घेण्यात यावी.

तरी, संबंधित खातेप्रमुख यांनी जरुर ती पुढील कार्यवाही करावी.

Ravi
(रविंद्र बिनवडे)
अति.महापालिका आयुक्त (ज)
पुणे महानगरपालिका
13/6/2024

प्रत-

१) संबंधीत खातेप्रमुख

२) संबंधित सेवक

यांसी शिक्षणाधिकारी माध्यमिक व तांत्रिक यांचे मार्फत....